ePaper

...तर स्क्रीन फोडणार, भारत -पाकिस्तान सामन्यावरुन शिवसेना ठाकरे गट आक्रमक

वर्ष - 9 । अंक -24 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । रविवार, दि. 14 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत


- श्रीलंकेचा बांगलादेशवर विजय!
- लोकांसाठी असेल हा सामना महत्वाचा
- नोटबंदीनंतर मला रांगेत उभं केलं!
- अवघ्या १५ हजारांसाठी सर्व गमावलं!


### 32 टक्के आरक्षणातील सर्व प्रवर्ग रद्द करा जरांगेंची सर्वात मोठी मागणी

# मनोज जरांगे-पाटील यांचा एक घाव दोन तुकडे!

## भुजबळांना डिवचले; सरकारने मराठा समाजाला दिलेल्या 10 टक्के आरक्षणाबाबत सुनावणी

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणाची चर्चा आहे. मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनानंतर मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळण्याचा मार्ग झाला आहे. मात्र राज्य सरकारने मराठा समाजाला याआधी 10 टक्के आरक्षण दिले होते. आज याबाबतची सुनावणी कोर्टात पार पडली. यावर मनोज जरांगे पाटलांनी आपले स्पष्ट मत व्यक्त केले आहे.**



राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. अनेक ओबीसी नेते या निर्णयाला विरोध करत आहेत. मंत्री आणि ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी लढाई लढणार असा निर्धार केला आहे. त्यानंतर आता जालन्यात बोलताना मनोज जरांगे पाटलांनी 32 टक्के आरक्षणातील सर्व प्रवर्ग रद्द करा अशी मागणी केली आहे.

### 50% च्या वर गेलेले आरक्षण टिकत नाही – जरांगे पाटील

आज 10 टक्के मराठा आरक्षणाबाबत कोर्टात सुनावणी पार पडली. यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, कमिशनने मराठा समाज मागास सिद्ध केलेला आहे, हे सगळ्यांनाच माहीत आहे. परंतु जे दहा टक्के आरक्षण दिले आहे, ते 50 टक्क्यांच्या वर आहे. त्यामुळे आम्ही वारंवार सांगत आहे की 50% च्या वर गेलेले आरक्षण टिकत नाही. देणारे तेच आहेत आणि घेणारे तेच आहेत, सगळे सरकारचेच लोक आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षण हक्काचं आहे आणि ते मिळवलं आहे.

### मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण कसं पुरेल?

पुढे बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, 'मराठ्यांना एक आरक्षण आहे, दोन आरक्षण आहे, तीन आरक्षण आहे असं जर प्रत्येक क्षेत्रात वाटत असेल आणि त्या क्षेत्रातून सुद्धा जर असे प्रश्न विचारले जात असतील, तर हे वेदनादायी आहे. आमचा समाजच तेवढा शिल्लक आहे त्यामुळे 10% पुरत नाही. ओबीसीत असून सुद्धा संख्येने आम्ही संपूर्ण राज्यात 50 55% आहे. या समाजाला दहा टक्के आरक्षण कसं पुरेल? त्यामुळे तुम्हाला दोन-तीन प्रकारचे आरक्षण आहे असं म्हणणं नेत्यांना शोभत नाही.'

### छगन भुजबळांवर सडकून टीका

काही लोकांच्या दादागिरीमुळे मराठा नेते बोलायला तयार नाहीत असं विधान छगन भुजबळ यांनी केलं होतं. यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, 'भुजबळांवर बोलायचं म्हटलं की माझं डोकं सरकतं, आम्ही एकमेकांचा आदर करतो, तुला अक्कल राहिली नाही, राजकारणी मराठ्यांमध्ये आणि गरीब मराठ्यांमध्ये गैरसमज कसा पसरेल एवढेच काम तू करतो. ते आमच्या दबावामुळे बोलत नाही,

ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी काही लोकांच्या दादागिरीमुळे मराठा नेते बोलायला तयार नाहीत असं विधान केलं होतं. यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, 'अरे त्याच्यावर बोलायचं म्हटलं की माझं डोकं सरकतं, आम्ही एकमेकाचा आदर करतो, तुला अक्कल राहिली नाही. राजकारणी मराठ्यांमध्ये आणि गरीब मराठ्यांमध्ये गैरसमज कसा पसरेल एवढेच काम तू करतो. ते आमच्या दबावामुळे बोलत नाही असा अर्थ नाही, आम्ही एकमेकांचा सन्मान करतो.'

### तुम्ही जातीवाद करता, जरांगे पाटलांचा आरोप

पुढे बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, 'तुमचा एक शब्द होता अराजकता माजेल, तेव्हापासून मराठे नेते टाइट झालेले आहे. तुझे शब्द आम्ही राखीव ठेवलेले आहे. तू किती शहाणा आहेस हे आम्हाला माहित आहे. पहिल्यांदा जशा दंगली केल्या तुमचे लोक घालून आणि त्या दंगली तुम्हीच केलेले आहेत असा देखील आरोप जरांगे पाटलांनी भुजबळ यांच्यावर केला आहे. अराजकता माजवेल म्हणजे तू काय दंगली घडवून आणतो का? आमचे मराठ्यांचे नेते तुझ्यासारखे नालायक आणि नासके नाहीत, जातीवाद करत नाहीत, तू जातीवाद करतो असा आरोपही जरांगे पाटलांनी केला आहे.

## 32 टक्के आरक्षणातील सर्व प्रवर्ग रद्द करा – जरांगे पाटील

जरांगे पाटलांनी पुढे बोलताना म्हटले की, 'मराठा धरून ओबीसी लोकसंख्या 60% आहे. बत्तीस टक्के आरक्षणात तुम्ही वेगळे प्रवर्ग केले, ते सगळे प्रवर्ग रद्द करायला पाहिजेत. ओबीसींसाठी 32 टक्के खुलं आरक्षण पाहिजे. आमच्यातरी नोंदी आहेत, तुमच्या तर नोंदी नाहीत, काहीही नाहीत' असा टोलाही जरांगे पाटलांनी छगन भुजबळ यांना लगावला आहे.

**कारवाईचा बडगा** दोन इमारती जमीनदोस्त; २० इमारतींना नोटीस...

# कोंढव्यातील बेकायदा बांधकामावर हातोडा!

## अनधिकृत बांधकामांवर कारवाई

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोंढवा खुर्द परिसरातील अनधिकृत बांधकामांवर महापालिकेने कारवाई सुरूच ठेवली आहे. शुक्रवारी (१२ सप्टेंबर) महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या विशेष पथकाने या परिसरातील शिवनेरीनगर, गल्ली क्रमांक १ येथे उभारण्यात आलेल्या पाच मजल्यांच्या दोन इमारतींसह सुमारे १५ हजार चौरस फूट आरसीसी बांधकाम जमीनदोस्त केले.**




शहरातील विविध भागांतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही कारवाई सुरू आहे. कोंढवा खुर्द भागात देखील मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहे. बांधकामे करताना पालिकेची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. येथील सदनिका या मोठ्या रक्कमेत विकल्या जात असल्याने नागरिकांची मोठी फसवणूक होत आहे. या बाबतच्या अनेक तक्रारी महापालिकेकडे करण्यात आल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत महापालिकेच्या बांधकाम विभागाने कोंढवा येथील अतिक्रमण करून बांधण्यात आलेल्या बांधकामावर कारवाई सुरू केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात महापालिकेने ही कारवाई थांबविली होती. मात्र, आता पुन्हा ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.कारवाई करण्यात आलेल्या इमारतींचा वापर किंवा वास्तव्य करू नये. तसेच या सदनिका खरेदी करू नयेत, असे आवाहन पुणे महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.महापालिकेने कोंढवा परिसरातील अनधिकृत २० इमारतींना नोटीस बजाविल्या आहेत. या सर्व इमारती पाडण्यात येणार आहेत. नागरिकांनी या इमारतींमधील सदनिका खरेदी करू नयेत. कोंढवा खुर्द परिसरातील अनधिकृत बांधकामांवर महापालिकेने कारवाई सुरूच ठेवली आहे. शुक्रवारी (१२ सप्टेंबर) महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या विशेष पथकाने या परिसरातील शिवनेरीनगर, गल्ली क्रमांक १ येथे उभारण्यात आलेल्या पाच मजल्यांच्या दोन इमारतींसह सुमारे १५ हजार चौरस फूट आरसीसी बांधकाम जमीनदोस्त केले. शहरातील विविध भागांतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही कारवाई सुरू आहे.

कोंढवा खुर्द भागात देखील मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहे. बांधकामे करताना पालिकेची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. येथील सदनिका या मोठ्या रक्कमेत विकल्या जात असल्याने नागरिकांची मोठी फसवणूक होत आहे. या बाबतच्या अनेक तक्रारी महापालिकेकडे करण्यात आल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत महापालिकेच्या बांधकाम विभागाने कोंढवा येथील अतिक्रमण करून बांधण्यात आलेल्या बांधकामावर कारवाई सुरू केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात महापालिकेने ही कारवाई थांबविली होती. मात्र, आता पुन्हा ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.कारवाई करण्यात आलेल्या इमारतींचा वापर किंवा वास्तव्य करू नये. तसेच या सदनिका खरेदी करू नयेत, असे आवाहन पुणे महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.महापालिकेने कोंढवा परिसरातील अनधिकृत २० इमारतींना नोटीस बजाविल्या आहेत. या सर्व इमारती पाडण्यात येणार आहेत. नागरिकांनी या इमारतींमधील सदनिका खरेदी करू नयेत. कोंढवा खुर्द परिसरातील अनधिकृत बांधकामांवर महापालिकेने कारवाई सुरूच ठेवली आहे. शुक्रवारी (१२ सप्टेंबर) महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या विशेष पथकाने या परिसरातील शिवनेरीनगर, गल्ली क्रमांक १ येथे उभारण्यात आलेल्या पाच मजल्यांच्या दोन इमारतींसह सुमारे १५ हजार चौरस फूट आरसीसी बांधकाम जमीनदोस्त केले.बांधकामांवर कारवाई करण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही कारवाई सुरू आहे. कोंढवा खुर्द भागात देखील मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहे.

### पाच मजली इमारती जमीनदोस्त

बांधकामे करताना पालिकेची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. येथील सदनिका या मोठ्या रक्कमेत विकल्या जात असल्याने नागरिकांची मोठी फसवणूक होत आहे.या बाबतच्या अनेक तक्रारी महापालिकेकडे करण्यात आल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत महापालिकेच्या बांधकाम विभागाने कोंढवा येथील अतिक्रमण करून बांधण्यात आलेल्या बांधकामावर कारवाई सुरू केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात महापालिकेने ही कारवाई थांबविली होती.

# ‘जीएसटी’ दरकपात हा समृद्धीचा महामार्ग

## भाजपाचे सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांचा दावा

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्रीय वस्तू आणि सेवा करांच्या (जीएसटी) पुनर्रचना व अधिक सुसूत्रीकरण करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या निर्णयामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेबरोबरच जनतेच्या जीवनशैलीला देखील नवी चालना मिळणार आहे, असा दावा भारतीय जनता पक्षाचे सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.**




जीएसटीमध्ये करण्यात आलेल्या बदलामुळे सामान्य माणूस, शेतकरी, मध्यम व लघु उद्योगक्षेत्र, मध्यमवर्गीय समाजघटक, महिला आणि युवावर्गाला फायदा होणार आहे. या सुधारणेमुळे नागरिक केंद्रीत उत्क्रांतीची सुरुवात झाली असून समाजाच्या अखेरच्या स्तरापर्यंतच्या प्रत्येक नागरिकाचे जीवनमान उंचावणार आहे, असे पाठक यांनी सांगितले. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, सरचिटणीस रवींद्र साळेगावकर, पश्चिम महाराष्ट्र माध्यम प्रमुख अमोल कविटकर, प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर, हेमंत लेले, पुष्कर तुळजापूरकर उपस्थित होते.

### नागरिकाचे जीवनमान उंचावणार

जीएसटीमध्ये करण्यात आलेल्या बदलामुळे सामान्य माणूस, शेतकरी, मध्यम व लघु उद्योगक्षेत्र, मध्यमवर्गीय समाजघटक, महिला आणि युवावर्गाला फायदा होणार आहे. या सुधारणेमुळे नागरिक केंद्रीत उत्क्रांतीची सुरुवात झाली असून समाजाच्या अखेरच्या स्तरापर्यंतच्या प्रत्येक नागरिकाचे जीवनमान उंचावणार आहे, असे पाठक यांनी सांगितले.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून २०१४ पर्यंत देशाच्या आर्थिक वाटचालीचा वेग संथ राहिला होता. या काळात भ्रष्टाचार आणि महागाई गगनाला भिडली होती. कर संकलनाची प्रक्रिया क्लिष्ट होती, अर्थकारणात पारदर्शकताही नव्हती. मात्र मोदी सरकारने हे ओळखून सुधारणांना बळ देणाऱ्या योजना आखल्या व त्यांच्या अंमलबजावणीवरही लक्ष केंद्रीत केले. त्यामुळेच आज देशातील २५ कोटी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखालून बाहेर आली असून देशाची अर्थव्यवस्था जागतिक स्तरावर चौथ्या क्रमांकावर पोहोचली आहे, असे पाठक म्हणाले.

## विरोधकांकडून आरोपांच्या फैरी
## महापालिका रुग्णालयात कॅशलेस व्यवहारासाठी

# खासगी कंपनी नियुक्तीचा घाट!

## रुग्णालयात अजूनही रोख रकमेवरच केसपेपर व बिल भरण्याची सक्ती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका रुग्णालय व दवाखान्यात अद्याप कॅशलेस सुविधा उपलब्ध नाही. रोख रक्कम भरुनच केसपेपर, बिलाची रक्कम जमा करावी लागत आहे. कॅशलेस सुविधा नसल्याने रुग्णाच्या नातेवाईकांची धावपळ होत असते. त्या संधीचा फायदा घेत राष्ट्रवादी काँग्रेस माजी विरोधी पक्षनेत्याने खासगी क्षेत्रातील' सबपैसा पेमेंट गेटवे' अंमलबजावणीचा प्रस्ताव सादर केला आहे. एसआरएस लाईव्ह टेक्नॉलॉजीज प्रा. लि. या ठेकेदार कंपनीला पायघड्या घालत थेट काम देण्याचा डाव आखला गेला आहे. महापालिकेकडे राष्ट्रीयकृत बँका असताना खासगी कंपन्यांकडे आर्थिक व्यवहाराचे जोखमीचे काम देण्याचा घाट घालण्यात आल्याचे समोर आले आहे. या विरोधात विरोधकांनी आक्षेप घेतला असून, प्रशासनावर देखील संशय व्यक्त केला आहे.**




महापालिकेची सर्वच रुग्णालये व दवाखाने कॅशलेस सुविधेअभावी मागे पडली आहेत. रुग्णालयात रोख रक्कम भरुनच केसपेपर, बिलाची रक्कम जमा करावी लागत आहे. कॅशलेस सुविधा नसल्याने रुग्णाच्या नातेवाईकांना ऐन वेळी धावपळ करावी लागते. रोख रकम जमा करण्यासाठी तारांबळ उडते. त्या रुग्णालयातील कर्मचारी रुग्ण व नातेवाईकांशी उद्धटपणे वर्तणूक करतात. त्यामुळे अनेकदा वादाचे प्रसंगही निर्माण झाले आहेत.

सरकारी सर्वच क्षेत्रात रोखीच्या व्यवहाराऐवजी कॅशलेस व्यवहार करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. महापालिकेत १ एप्रिलपासून पेपरलेस डिजीटल ई ऑफीस कारभार सुरू झाला आहे. उद्यान विभागाची तिकीटही आता ऑनलाईन काढता येतात. मात्र, महापालिकेची रुग्णालये, दवाखान्यांमध्ये डिजिटल आर्थिक व्यवहार सुरु करण्यात अद्याप यश आलेले नाही. महापालिकेच्या लेखा विभागाची विविध राष्ट्रीयकृत बँकाकडे खाती आहेत.

त्या राष्ट्रीयकृत बँकाकडून महापालिकेच्या रुग्णालय व दवाखान्यात ऑनलाईन कॅशलेस सुविधा उपलब्ध करुन दिली जावू शकते. तसे न करता राजकीय दबावामुळे खासगी क्षेत्रातील कॅसलेस सुविधासाठी थेट कंपन्याचे प्रस्ताव मागवून त्यांना काम देण्याचा डाव आखला आहे.

त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी विरोधी पक्षनेत्यांने प्रशासनावर दबाव आणला आहे. एसआरएस लाईव्ह कंपनीला काम देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. याकरिता लेखा विभागाकडे आयुक्तांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. कंपनीने त्यासाठी सबपैसा पेमेंट गेटवेच्या प्रस्ताव दिला आहे. खाजगी कंपनीकडून रुग्णालयात कॅशलेस सुविधा देण्याचा घाट घालण्यात आला आहे.

### रुग्णालयास कॅशलेसच्या ६० मशिन

महापालिकेच्या रुग्णालयात कॅशलेस व्यवहार करण्यासाठी ६० मशीन दिल्या आहेत. लवकरच महाराष्ट्र बँकेकडून ऑनलाईन सुविधा सुरु होतील. सबपैसा पेमेंट गेटवेच्या एका कंपनीचा प्रस्ताव आला आहे. त्या प्रस्तावावर अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, असे महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी सांगितले.

### लवकरच कॅशलेस सुविधा

महापालिकेच्या रुग्णालये, दवाखान्यांमध्ये डिजिटल व्यवहार लवकरच सुरू करण्याचे नियोजन आहे. महाराष्ट्र बँकेकडून सर्व्हे देखील केलेला आहे. लेखा विभागाकडून काही ठिकाणी मशीन उपलब्ध झाल्या आहेत. त्यांची प्रक्रिया सुरू आहे. सबपैसा ऑनलाईन पेमेंटबाबत कोणतीही माहिती नाही, असे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.

---

# आरआरआर' सेंटर हा गरजूंचा आधार ठरेल'

## महापालिकेचा विश्वास; सेंटरमध्ये वस्तू जमा करण्याचे नागरिकांना आवाहन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या पुढाकाराने शहरात रीड्यूस – रीयुज – रिसायकल (आर.आर.आर ) सेंटर सुरू करण्यात आले आहेत. मोरवाडी येथील कापसे उद्यानातील आर.आर.आर. सेंटरला शनिवारी महापालिकेचे उपायुक्त सचिन पवार यांनी भेट देऊन उपक्रमाचा सविस्तर आढावा घेतला.**



शहरातील आठही प्रभागांत उभारण्यात आलेल्या या केंद्रांमधून नागरिकांकडून घरात पडून असलेल्या पण अजूनही उपयोगी वस्तू संकलित केल्या जात आहेत. त्यानंतर या वस्तू गरजूंपर्यंत मोफत पोहोचवल्या जातात. या उपक्रमामुळे शहरातील कचऱ्याचे प्रमाण कमी होत असून गरजूंना उपयुक्त साहित्य सहज उपलब्ध होत आहे.

"घरातील वापरण्यायोग्य वस्तू कचऱ्यात न टाकता जर या केंद्रांवर आणल्या, तर त्या इतरांना उपयोगी पडू शकतात. हे पर्यावरण संवर्धनासह सामाजिक जाणीवेचेही काम आहे. त्यामुळे नागरिकांनी आर.आर.आर. उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदवावा," असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी यावेळी केले.

महापालिका आयुक्त व प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली हा उपक्रम राबवला जात आहे. संकलित साहित्याचे प्रथम विलगीकरण करून त्यातील उपयुक्त वस्तू गरजूंना मोफत दिल्या जातात, तर उर्वरित वस्तू रिसायकल प्रक्रियेद्वारे नव्या स्वरूपात आणल्या जातात.

यावेळी "अ" क्षेत्रीय सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक दत्तात्रय गणगे, आरोग्य निरीक्षक स्नेहा चांदणे, ओंजळ संस्थेचे पदाधिकारी व अन्य कर्मचारी आदी उपस्थित होते.

### पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तू

पुस्तके, वह्या, शालेय साहित्य, चांगल्या स्थितीतील कपडे, चादरी, पडदे, खेळणी, शैक्षणिक साधने, घरगुती साहित्य, भांडी, फर्निचर, छोटे-मोठे इलेक्ट्रॉनिक उपकरणे, चपला तसेच पुनर्वापर करता येणाऱ्या इतर वस्तू.

# जनतेच्या समस्यांचा अंत होणार तरी कधी?




**२०२४ साठीच्या लोकसभा निवडणुकांचे निकाल आज हाती येतील. त्यानंतर सत्तेवर येणाऱ्या नव्या सरकारने देशातील गेल्या अनेक वर्षापासून अक्षरशः लोबकळत पडलेलल्या महत्वाच्या समस्यांच्या निराकरणासाठी कसोशीने प्रयत्न करुन त्या समस्या प्राधान्याने मागीA लावाव्यात अशी अपेक्षा भोळीभाबडी जनता प्रत्येक निवडणुकीच्यावेळी करीत असते. परंतु आजवर त्यांच्या अपेक्षांना छेदच गेला आहे.**

आज, मंगळवार ४ जून २०२४ रोजी लोकसभा निवडणुकीची मतगणना होऊन जून अखेरपर्यंत नवे सरकार तयार होईल. दोन दिवसांपूर्वीA जाहीर झालेल्या एक्झीट पोल नंतर आता देशात 'रालोआ' आघाडीचे सरकार येईल की 'इंडिया' आघाडीचे याबाबत कमालीची उत्सुकता व चर्चाचर्वण सुरू आहे. भारतातील प्रत्येक नागरिकाचेच नव्हे तर संपूर्ण जगाचे लक्ष याकडे लागले आहे. आणि गेलेली सत्ता पुन्हा मिळविणे किती आवश्यक आहे, असा तो दर पाच वर्षांनी होणारा संघर्ष आहे. राजकीय बदल काहीही होत असले तरी लोकजीवनाचे काही आर्थिक प्रश्न जुन्या धोरणांमधून एकत्रित होतात आणि ते प्रश्न सुटणे आवश्यक होऊन जाते. म्हणून दरवेळी जनतेच्या नव्या अपेक्षा नसतात, तर त्याच अपेक्षा नव्याने व्यक्त होतात. काही प्रश्न नागरिक, काही सामाजिक संघटना तर काही उद्योजकांच्या संस्था-संघटनाकडून उपस्थित केले



जातात. आजच्या परिस्थितीत अनुभव असा आहे की, सरकार उद्योजकांच्या सूचनांकडे लवकर लक्ष देते. परिणामी प्रत्यक्ष जीवनातील विशेषत: ग्रामीण प्रश्न पुन्हा कायम राहतात. देशात सर्वात मोठी निराशा बेरोजगारीच्या प्रश्नावर आहे. २०१४ च्या निवडणूक प्रचाराच्या वेळी सांगितले गेले की, दरवर्षी दोन कोटी रोजगार निर्माण केला जाईल परंतु २०२४ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था दरवर्षी सुमारे एक कोटीपेक्षा अधिक रोजगार निर्माण करू शकलेली नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा तर न संपणारा विषय आहे. शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नाही. शेतीतील उत्पादन घटक वस्तूचे जसे बियाणे, खते, कीटकनाशके, अवजारे, यंत्रसामग्री, वीज, यांचे दर उद्योजक ठरवतात. शेतकऱ्यांच्या उत्पादित मालांची किंमतही कृषी व्यापार कंपन्या ठरवतात. त्यामुळे शेती क्षेत्र पूर्णपणे उद्योगांच्या हातात अडकले आहे. शेतमालाला किमान हमीभाव द्यावा आणि तसा कायदा करावा, अशी मागणी शेतकऱ्यांच्या संघटना करतात तेव्हा सरकार असा कायदा करत नाही! मग खर्च आणि उत्पन्नाचा मेळ न जुळल्यामुळे शेतकरी कर्जे परत करू शकत नाही व आत्महत्या करतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची १६ मे २०२४ रोजी प्रकाशित २०२२ या वर्षाची आकडेवारी दर्शवते की, त्या वर्षात एकूण ११,२९० शेतकरी आत्महत्या घडून आल्या. त्यापैकी सर्वात जास्त ४,२४८ (३७.६) आत्महत्या महाराष्ट्रात घडून आल्या. त्या आत्महत्या शून्यावर आणण्यासाठी प्रयत्न करणारे आणि त्यासाठी आवश्यक ते संरचनात्मक बदल घडवून आणणारे सरकार आता लोकांना हवे आहे. उत्पन्नातील विषमता ही देखील देशाला लागलेली कीडच आहे. आज जगात दक्षिण आफ्रिÂका वगळल्यास सगळ्यात जास्त उत्पन्न विषमता, गरीब-श्रीमंत रुंदावणारी दरी भारतात आहे. इतर देशांना विषमता नियंत्रणात आणणे बऱ्याच अंशी जमले ते भारत सरकारला का जमले नाही, असा जनतेला पडलेला गहन प्रश्न आहे. ही उत्पन्न वितरणाची संरचना झाली असेल तर आपण सकल उत्पन्नाच्या बाबतीत जगात तिसऱ्या नव्हे दुसऱ्या क्रमांकाची महाशक्ती झालो तरी विषमता वाढविणाऱ्या शक्ती अधिक प्रबळ होत जातील. त्यावर उपाय ग्रामीण रोजगार वाढवणे, तो स्थिर करणे व त्याच्या मजुरीत, शेतमालाच्या किमतींमध्ये वाढ करणे महत्त्वाचे व अनिवार्य आहे. याची मुळीच चर्चा निवडणूक पर्वात घडून आली नाही ही दुर्दैवाची बाब आहे. आजही जरी सार्वजनिक क्षेत्रामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला बरेच स्थैर्य लाभलेले आहेलोकसंख्येचा रोजगार, सामाजिक कल्याण याबाबतचे धोरणही खासगी क्षेत्रच सरकारला सुचवेल. परिणामी कोणत्या राजकीय आघाडीजवळ लोकसभेत किती प्रतिनिधी असतील हे कदाचित कमी महत्त्वाचे होऊन जाईल. या सर्व प्रश्नांचे उत्तर आज, मंगळवारी लोकसभा निवडणुकीच्या जाहीर होणाऱ्या निकालानंतर देशात सत्तेवर येणारा राजकीय पक्षच देऊ शकणार आहे.

## संपादकीय »

### अन् मी इकडे

***भाजप वा काँग्रेस या दोन ध्रुवीय पक्षांपैकी एकाचा हात उघडपणे धरला तरच प्रादेशिक पक्षांना अपेक्षित जागा, हा अंदाज राजकारणाचा पोत बदलणारा आहे...***

निवडणुकांच्या रणधुमाळीत राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांच्या एका विधानाने बराच राजकीय धुरळा उडाला. अनेक लहान लहान पक्षांनी काँग्रेसमध्ये विलीन व्हावे अशा अर्थाचे विधान पवार यांनी केले. 'लोकसत्ता लोकसंवाद' उपक्रमात बोलताना त्यांनी या विधानाचे स्पष्टीकरण दिले. देशातील अनेक लहान पक्षांचे मूळ खोड काँग्रेस. या अशा पक्षांना एकत्र आणण्याचा विचार काँग्रेसला करावा लागेल आणि या अशा पक्षांनाही काँग्रेसशी सहकार्य करण्याचा अथवा त्या पक्षात विलीन होण्याचा विचार करावा लागेल, असा त्यांच्या प्रतिपादनाचा अर्थ असावा. 'असावा' असे म्हणायचे याचे कारण पवार यांच्यासारखा मुरब्बी राजकारणी उगाच कोणतेही विधान 'सहज सुचले म्हणून' करत नाही आणि अशांकडून जे विधान केले जाते त्याचा अर्थ केवळ तत्कालिकतेत राहात नाही.

आयुष्यात प्रत्येकाने एकदा तरी अनुभवलेली .... मन गलबलून टाकणारी , नकळत डोळ्यांच्या कपारी ओल्या करणारी कातरवेळ .... मनाला कातर करणारी वेळ , निसटलेल्या क्षणांची , हरवलेल्या स्नेहीजणांची , मनात बंदिस्त असणाऱ्या परंतु उचंबळून न आलेल्या त्या कोवळ्या सुखस्वप्नांची आठवण आणि जाणीव करून देणारी वेळ

# कातरवेळेची घालमेल..।

कातरवेळ ....त्या कातरवेळी मन माझं गलबलतं .... आतून दाटून येतं .... कातरवेळ .... सूर्यास्तानंतर मिट्ट काळोख होईपर्यंतचा मधला काळ ,,,, जेमतेम पाऊण एक तासाचा .... पण ही वेळ कशी जीवघेणी असू शकते ह्याचा अनुभव प्रत्येक जण क्षणोक्षणी घेत असतो . मग तो अनुभव कुठल्याही प्रकारचा असू शकतो .... सहज वाटलं म्हणून म्हणा की सहजच मनात विचार आला .... अन तो ही अशाच कातरवेळी तशी कातरवेळ ही अतिशय जीवघेणी असते त्यावेळी मनाची जी घालमेल असते ती शब्दातीत नाहीये म्हणून मलाही असंच एका कातरवेळी सुचलं अन मनात आलं की मला माझ्या भविष्यातील " मला " च भेटायचंय .... विचारायचंय माझं मलाच तू कसा आहेस ? असा काहीसा विचार मनात आला . म्हटलं काय हरकत आहे . आपण इतरांची चौकशी करतो ना , मग आपणच आपली चौकशी करावी की ....म्हणून हा चोंबडेपणा ...आपलाच संवाद आपल्याशी ....रावंच म्हटलं



माझं मलाच ...सा आहेस रे बाबा तू ....? अजूनही तसाच आहेस का .... ? कधी कधी खूपच कॉन्फिडेंट तर कधी कधी कनफुज्ड ....काहीतरी वेगळं अस केलंस की नाही तू आयुष्यात....? की , बस्स आला दिवस अन गेला दिवस .... आता तरी खुश आहेस की नाही आयुष्यात , जे काही तू साध्य केलं आहेस त्यात ..... आणि हो , काहीतरी साध्य केलंयस तरी का .... ? फिरायला तुला खुप खुप आवडायचं अरे फिरलास की नाही इथे तिथे ....? भटकंती केलीस की नाही ...? यशस्वी झाला आहेस की नाही .... ? अरे , नोकरी करतोस की स्वतः चा व्यवसाय करतोस .... ? आयुष्यात आता तरी न डगमगता निर्णय घेऊ शकतोस की अजूनही द्विधा मनस्थितीत मध्ये अडकलेला आहेस ? आता तरी शहाणपणे निर्णय घेतोस की नाही , की धडपडतच चाललंय सगळं ....? तू नव्या चुका करतोस की त्याच त्याच परत करतोस ....! अरे , बायका पोरांना घेऊन भ्रमंती करतोस की , फक्त ९ ते ५ जॉब मध्ये अडकला आहेस .... ? आयुष्य ऑफिस ते घर या प्रवासातच संपतंय कि इतरही तुझे छंद जोपासतोस की नाही .... ? काहीही करत असलास तरी प्लिज मला आधीच हे सगळं सांगशील का गोंधळलेला , माती खात खात , चुका करत करत जगणाऱ्या मला जरा तरी सुगावा लागू देशील का ?.म्हणजे माझं उर्वरित आयुष्य थोडंसं समजदारपणे पार पडेल ....! अशी संध्याकाळ म्हणा किंवा कातरवेळ ही प्रत्येकाच्या आयुष्यात नेहमीच येत असते आणि त्यावेळी मनात आलेले विचार , त्यावेळच्या उचंबळून येणाऱ्या भावना यांना मुक्तपणे उधळून द्यायला हवंय

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## ओबीसी आरक्षणावरून राजकारण राजकीय परिस्थितीवर पवार यांचे मोठं विधान

# काय वाट्टेल ती किंमत मोजू, पण

## आरक्षणावरून राजकारण तापलेलं

## ओबीसी आक्रमक झाले.

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून चांगलंच राजकारण तापलेलं आहे. यातच काही दिवसांपूर्वी कुणबी नोंद असलेल्या मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी अध्यादेश काढला. या अध्यादेशामुळे ओबीसी आक्रमक झाले. सरकारच्या अध्यादेशामुळे ओबीसींवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.**



राज्यात सध्या ओबीसी आणि मराठा आरक्षणाचा मुद्दा गंभीर बनला असून ओबीसी आणि मराठा समाज आमने-सामने येत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. याच मुद्यांवरून नेत्यांमध्येही आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्यामुळे काही ठिकाणी सामाजिक समतोल ढासळत असल्याचंही चित्र पाहायला मिळत आहे.दरम्यान, राज्यातील सामाजिक ऐक्यावर आणि राज्यातील राजकीय परिस्थितीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी नाशिकमधील एका कार्यक्रमात बोलताना मोठं विधान केलं आहे.'काय वाट्टेल ती किंमत मोजू, पण महाराष्ट्र एकसंघ कसा राहील यासाठी प्रयत्न करू', असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्राचं चित्र सध्या थोडं वेगळं झालेलं आहे. समतेचा विचार हा अस्थिर होतोय का काय असं दिसतंय. समाजिक ऐक्याची वीण उसवली जात असल्याचं चित्र दिसत आहे. माझ्या मते महाराष्ट्रासमोर हे एक प्रकारचं आव्हान आहे. मात्र, काय वाट्टेल ती किंमत मोजू पण सामाजिक ऐक्य जपू, महाराष्ट्र एकसंघ कसा राहिल यासाठी आणि महाराष्ट्रातील सर्व जाती धर्मांच्या लोकांना एकत्रित कसं ठेवता येईल यासाठी व महाराष्ट्राचा लौकिक पुढे घेऊन जाण्यासाठी जे काही करावं लागेल ते करण्यासाठी तुम्ही आम्ही आणि सर्वांनी पुढे आलं पाहिजे", असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.गेल्या काही दिवसांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून चांगलंच राजकारण तापलेलं आहे. यातच काही दिवसांपूर्वी कुणबी नोंद असलेल्या मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी अध्यादेश काढला. या अध्यादेशामुळे ओबीसी आक्रमक झाले. सरकारच्या अध्यादेशामुळे ओबीसींवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. राज्यात सध्या ओबीसी आणि मराठा आरक्षणाचा मुद्दा गंभीर बनला असून ओबीसी आणि

याच मुद्यांवरून नेत्यांमध्येही आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्यामुळे काही ठिकाणी सामाजिक समतोल ढासळत असल्याचंही चित्र पाहायला मिळत आहे.दरम्यान, राज्यातील सामाजिक ऐक्यावर आणि राज्यातील राजकीय परिस्थितीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी नाशिकमधील एका कार्यक्रमात बोलताना मोठं विधान केलं आहे. 'काय वाट्टेल ती किंमत मोजू, पण महाराष्ट्र एकसंघ कसा राहील यासाठी प्रयत्न करू'.

मराठा समाज आमने-सामने येत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. याच मुद्यांवरून नेत्यांमध्येही आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्यामुळे काही ठिकाणी सामाजिक समतोल ढासळत असल्याचंही चित्र पाहायला मिळत आहे.दरम्यान, राज्यातील सामाजिक ऐक्यावर आणि राज्यातील राजकीय परिस्थितीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी नाशिकमधील एका कार्यक्रमात बोलताना मोठं विधान केलं आहे. 'काय वाट्टेल ती किंमत मोजू, पण महाराष्ट्र एकसंघ कसा राहील यासाठी प्रयत्न करू', असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्राचं चित्र सध्या थोडं वेगळं झालेलं आहे. समतेचा विचार हा अस्थिर होतोय का काय असं दिसतंय. समाजिक ऐक्याची वीण उसवली जात असल्याचं चित्र दिसत आहे. माझ्या मते महाराष्ट्रासमोर हे एक प्रकारचं आव्हान आहे. मात्र, काय वाट्टेल ती किंमत मोजू पण सामाजिक ऐक्य जपू, महाराष्ट्र एकसंघ कसा राहिल यासाठी आणि महाराष्ट्रातील सर्व जाती धर्मांच्या लोकांना एकत्रित कसं ठेवता येईल यासाठी व महाराष्ट्राचा लौकिक पुढे घेऊन जाण्यासाठी जे काही करावं लागेल ते करण्यासाठी तुम्ही आम्ही आणि सर्वांनी पुढे आलं पाहिजे", असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.राज्यात सध्या ओबीसी आणि मराठा आरक्षणाचा मुद्दा गंभीर बनला असून ओबीसी आणि मराठा समाज आमने-सामने येत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

# सातारा शहरासह जिल्ह्यात दमदार पाऊस

## निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्यासाठी आलेल्या पर्यटकांची धावपळ उडाली

## . पावसाने मजुरांचीही धावपळ उडाली

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सातारा कास पठारसह महाबळेश्वर, पाचगणी, वाई, जावली भागात दुपारी जोरदार पाऊस झाला. या पावसाने कास पठारावर फुलांचा व निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्यासाठी आलेल्या पर्यटकांची एकच धावपळ उडाली. दरम्यान या पावसाने पुणे बंगळुरू महामार्गावर सखल भागात पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती.**



मागील काही दिवस उघडीप घेतलेल्या पावसाने शनिवारी दुपारी जोरदार हजेरी लावली. या पावसाने सातारा शहरासह उपनगरांमध्ये पाणी पाणी झाले. सखल भागात पाणी साचले. आता पाऊस उघडला असे समजून बाहेर पडलेल्या नागरिकांना व कामकऱ्यांना अचानक आलेल्या पावसाने आडोसा शोधावा लागला. सातारा, वाई, पाचगणी, महाबळेश्वर शहरात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शेती पिकांना मदत झाली. मात्र अनेक भागांत घेवडा काढणीची लगबग सुरू आहे. पावसाने

. सखल भागात पाणी साचले. आता पाऊस उघडला असे समजून बाहेर पडलेल्या नागरिकांना व कामकऱ्यांना अचानक आलेल्या पावसाने आडोसा शोधावा लागला.सातारा, वाई, पाचगणी, महाबळेश्वर शहरात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शेती पिकांना मदत झाली. मात्र अनेक भागांत घेवडा काढणीची लगबग सुरू आहे. पावसाने मजुरांचीही धावपळ उडाली.

मजुरांचीही धावपळ उडाली. कास पठारावरील फुलांचा हंगाम सुरू झाला आहे.

त्यामुळे मुबई पुण्यासह सांगली सोलापूर साताऱ्यातील पर्यटक मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. शनिवार, रविवार सुट्यांमुळे पठारावर मोठी गर्दी झाली आहे. दुपारपर्यंत पावसाचा अंदाज नव्हता. मात्र अचानक आलेल्या जोरदार पावसाने पर्यटकांची एकच धावपळ उडाली. आडोसा शोधेपर्यंत अनेक पर्यटक पावसात भिजले. निसर्गसौंदर्य आणखी खुलले. पठारावर पावसासोबत ढग उतरल्याने याचा पर्यटकांनी आनंद घेतला.

## दिल्ली पोलिसांची कारवाई मोदींच्या आईचा AI व्हिडीओ बनवणं भोवलं

# नोटबंदीनंतर मला रांगेत उभं केलं!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहार विधानसभेची निवडणूक तोंडावर आली आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांकडून निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली आहे. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असल्यामुळे बिहारमध्ये चांगलंच राजकारण तापलं आहे. दरम्यान, बिहार विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा पंतप्रधान मोदी यांच्या आईचा उल्लेख झाला आहे.**

## पंतप्रधान मोदी यांच्या आईचा उल्लेख



बिहार काँग्रेसच्या सोशल मीडिया हँडलवरून पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या मातोश्रींचा एआयवर तयार केलेला व्हिडीओ शेअर करण्यात आल्याने राजकारण तापलं आहे. या व्हिडीओमध्ये पंतप्रधान मोदींच्या स्वप्नात त्यांची आई त्यांच्यावर ओरडताना दिसत आहे. या व्हिडीओनंतर भाजपाने काँग्रेसवर टीका केली असून अशा व्हिडीओमुळे काँग्रेसने खालचा स्तर गाठल्याचं म्हटलं आहे. तसेच सदर व्हिडीओ कुणाचाही अनादर करण्यासाठी तयार केलेला नसल्याचं काँग्रेसने म्हटलं. या AI व्हिडीओ बनवल्याच्या प्रकरणी आता काँग्रेसविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. पंतप्रधान मोदींच्या आईचा एआय व्हिडीओ बनवून बिहार काँग्रेस युनिटने त्यांच्या एक्स हँडलवर पोस्ट केल्याप्रकरणी भाजपा कार्यकर्त्याच्या तक्रारीवरून दिल्ली पोलिसांनी शनिवारी एफआयआर नोंदवल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.वृत्तानुसार, भाजपाचे पदाधिकारी संकेत गुप्ता यांनी शुक्रवारी नॉर्थ अव्हेन्यू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत आरोप केला की, या व्हिडिओने पंतप्रधानांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला आहे. कायदा, नैतिकता आणि महिलांच्या प्रतिष्ठेचं उल्लंघन केलं आहे. ही क्लिप भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, बिहार युनिटच्या अधिकृत एक्स हँडलवर १० सप्टेंबर रोजी पोस्ट करण्यात आली होती, असं तक्रारीत म्हटलं.बिहार काँग्रेसने १० सप्टेंबर रोजी ३६ सेकंदाचा एआयने तयार केलेला व्हिडीओ शेअर केला होता. ज्यात पंतप्रधान मोदी म्हणतात, “आजची मतदान चोरी झाली. आता झोपायला जातो.” यानंतर पंतप्रधान मोदींच्या स्वप्नात त्यांच्या मातोश्री दाखविल्या गेल्या. त्या म्हणतात, “तू नोटबंदीनंतर मला रांगेत उभे केलेस. माझे पाय धुण्याचे रिल बनवलेस आणि आता बिहारमध्ये माझ्या नावावर राजकारण करत आहेस. तू माझ्या अवमानाचे बॅनर लावत आहेस, पोस्टर छापत आहेस. तू पुन्हा बिहारमध्ये नाटक करत आहेस. राजकारणाच्या नावावर किती खाली पडशील.”

## निवडणुकीची जोरदार तयारी सुरू

.वृत्तानुसार, भाजपाचे पदाधिकारी संकेत गुप्ता यांनी शुक्रवारी नॉर्थ अव्हेन्यू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत आरोप केला की, या व्हिडिओने पंतप्रधानांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला आहे. कायदा, नैतिकता आणि महिलांच्या प्रतिष्ठेचं उल्लंघन केलं आहे. ही क्लिप भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, बिहार युनिटच्या अधिकृत एक्स हँडलवर १० सप्टेंबर रोजी पोस्ट करण्यात आली होती, असं तक्रारीत म्हटलं.

यानंतर पंतप्रधान मोदी झोपेतून दचकून उठताना दाखवले गेले आहे.भाजपाचे प्रवक्ते शहजात पूनावाला यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, बिहार काँग्रेसने अतिशय घृणास्पद प्रकार केला असून सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. हा पक्ष आता गांधीवादी नसून गल्लीवादी बनला आहे. ‘महिला, मातृशक्ती का अपमान, यही काँग्रेस की पेहचान’, अशी हिंदीतील घोषणाही त्यांनी दिली. आधी बिहारला बिडीशी जोडून आणि आता दिवंगत व्यक्तीला अपमानित करून काँग्रेसने लाजिरवाणे कृत्य केल्याचं त्यांनी म्हटलं. बिहार काँग्रेसच्या सोशल मीडिया हँडलवरून पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या मातोश्रींचा एआयवर तयार केलेला व्हिडीओ शेअर करण्यात आल्याने राजकारण तापलं आहे. या व्हिडीओमध्ये पंतप्रधान मोदींच्या स्वप्नात त्यांची आई त्यांच्यावर ओरडताना दिसत आहे. या व्हिडीओनंतर भाजपाने काँग्रेसवर टीका केली असून अशा व्हिडीओमुळे काँग्रेसने खालचा स्तर गाठल्याचं म्हटलं आहे. तसेच सदर व्हिडीओ कुणाचाही अनादर करण्यासाठी तयार केलेला नसल्याचं काँग्रेसने म्हटलं. या AI व्हिडीओ बनवल्याच्या प्रकरणी आता काँग्रेसविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. युनिटने त्यांच्या एक्स हँडलवर पोस्ट केल्याप्रकरणी भाजपा कार्यकर्त्याच्या तक्रारीवरून दिल्ली पोलिसांनी शनिवारी एफआयआर नोंदवल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली आहे.

# अवघ्या १५ हजारांसाठी सर्व गमावलं!

## सिव्हिल सर्व्हिसेस परीक्षेतील तहसीलदार लाच प्रकरणी गजाआड

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ओडिशा दक्षता विभागाने (ODISHA VIGILANCE) शुक्रवारी संबलपूर जिल्ह्यातील बामरा येथील तहसीलदार, अश्विनी कुमार पांडा यांना कथितपणे १५,००० रुपयांची लाच घेतल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आले आहे. विशेष बाब म्हणजे, पांडा हे राज्य नागरी सेवा परीक्षेतील (STATE CIVIL SERVICE EXAM) टॉपर आहेत.**



दक्षता विभागाने जारी केलेल्या निवेदनानुसार, शेत जमिनीचे रुपांतरण होमस्टेड जमिनीमध्ये करण्यासाठी या अधिकाऱ्याने तक्रारदराकडून लाच घेतली. दक्षता विभागातील अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, तक्रादाराने एक महिन्यापूर्वी तहसीलदार कार्यालयात जमिनीचे रुपांतर करण्यासाठी अर्ज दाखल केला होता .दक्षता विभागाने जारी केलेल्या निवेदनानुसार, पांडाने तक्रारदाराच्या बाजूने जमिनीचे रुपांतरण आणि रेकॉर्ड ऑफ राईट (ROR) जारी करण्यासाठी २०,००० रुपयांची लाच मागितली होती. जेव्हा इतक्या मोठ्या प्रमाणात लाच देणे शक्य नसल्याचे सांगितल्यानंतर पांडाने लाचेची रक्कम १५,००० रुपयांपर्यंत कमी केली आणि त्याशिवाय रुपांतरणांची परवानगी देणार नाही अशी धमकी देखील दिली.यानंतर तक्रारदाराने दक्षता विभागातील अधिकाऱ्यांकडे धाव घेतली, ज्यानंतर शुक्रवारी सापळा लावण्यात आला. त्यानंतर दक्षता विभागाने तहसीलदाराला कथितपणे तक्रारदाराकडून ड्रायव्हरच्या माध्यमातून लाच घेताना त्याच्या कार्यालयातून पकडले. लाच म्हणून देण्यात आलेली सर्व रक्कम जप्त करण्यात आली आहे.

## घरातून मोठी रक्कम जप्त

असेही दक्षता विभागाने त्यांच्या निवेदनात म्हटले आहे.या शोध मोहिमेदरम्यान दक्षता विभागाला भुवनेश्वर येथील घरात ४,७३,००० रुपये रोकड आढळून आली. पांडा याचा चालक पी प्रवीण कुमार याला देखील दक्षता विभागाने भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक केली आहे. दरम्यान या प्रकरणात पुढील तपास केला जात आहे.

# DDLJ मध्ये शाहरुखने घातले होते 400 डॉलरचे जॅकेट

शाहरुख खान आणि काजोल स्टारर 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' या चित्रपटाशी संबंधित एक किस्सा समोर आला आहे. या चित्रपटात शाहरुख लेदर जॅकेट घातलेला दिसत आहे. चित्रपट रिलीज झाल्यापासून ते जॅकेट खूप ट्रेंडमध्ये होते. शाहरुखला ते जॅकेट घालायचे आधीच ठरले नव्हते. ते जॅकेटही चित्रपटासाठी डिझाइन केलेले नव्हते. वास्तविक, ते जॅकेट चित्रपट निर्माता आदित्य चोप्राचा धाकटा भाऊ उदय चोप्राचे होते. उदय चोप्रा त्यावेळी त्याच्या मोठ्या भावाला दिग्दर्शनात मदत करत होता. विशेष म्हणजे शाहरुखने शूटिंगदरम्यान ते जॅकेट घातले होते कारण त्याला थंडी वाजत होती. आता त्याच्यावर हे जॅकेट



दिग्दर्शकाला इतकं आवडलं की या जॅकेटमध्ये 'जरा सा झूम लू मैं' या चित्रपटाचं प्रसिद्ध गाणं चित्रीत झालं. या गाण्यात शाहरुखने तेच जॅकेट घातलेला दिसत आहे. उदय चोप्राने हे जॅकेट कॅलिफोर्नियातील बेकर्सफील्ड येथील हार्ले डेव्हिडसन शोरूममधून $400 मध्ये विकत घेतले. भारतीय चलनानुसार 400 डॉलर म्हणजे 33000. हे एक शुद्ध लेदर जॅकेट होते जे आजही ट्रेंडमध्ये आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील हा पहिला चित्रपट होता ज्याने स्वतःच्या मेकिंगचीही निर्मितीही केली होती. तांत्रिकदृष्ट्या तेव्हापासून ते 'बिहाइंड द सीन' म्हणून ओळखले जाते. आदित्य चोप्राचा धाकटा भाऊ उदय चोप्रा हा चित्रपटात त्याचा सहाय्यक होता, ज्याला मेकिंग रेकॉर्डिंगची जबाबदारी मिळाली.

# नताशाच्या घरी आनंदाची बातमी

बॉलीवूड अभिनेता वरुण धवन बाबा झाला आहे. वरुण धवन व नताशा दलाल यांच्या घरी चिमुकल्या सदस्याचं आगमन झालं आहे. नताशाने आज बाळाला जन्म दिला असून वरुणचे बाबा व बाळाचे आजोबा डेव्हिड धवन यांनी आनंदाची बातमी दिली आहे.आज दुपारी वरुण मुंबईतील रुग्णालयाबाहेर पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाला होता. तेव्हापासून वरुणच्या बाळाबद्दल चर्चा सुरू होती. नताशाची प्रसूती झाली असून तिने गोंडस लेकीला जन्म दिला आहे. डेव्हिड धवन यांनी बाळाची भेट घेऊन रुग्णालयातून निघताना नताशाने मुलीला जन्म दिल्याची माहिती दिली. डेव्हिड धवन यांचा व्हिडीओ वरिंदर चावला या पापाराझी अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. वरुण व नताशा यांना मुलगी झाली आहे, असं डेव्हिड धवन यांनी सांगितलं.वरुण धवन व नताशा लग्नानंतर तीन वर्षांनी आई- बाबा झाले आहेत. फेब्रुवारी महिन्यात वरुण व नताशा यांनी ते आई-बाबा होणार असल्याची बातमी सोशल मीडियावर पोस्ट करून शेअर केली होती. वरुणने नताशा व त्याचा एक फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला होता. फोटोमध्ये वरुण गरोदर नताशाच्या बेबी बंपचे चुंबन घेताना दिसत होता. हा फोटो शेअर करत त्याने “आम्ही प्रेग्नंट आहोत, आम्हाला तुमच्या प्रेमाची व आशीर्वादाची गरज आहे,” असं लिहिलं होतं. सेलिब्रिटी व चाहत्यांनी या पोस्टवर कमेंट करत दोघांचे अभिनंदन केले होते.



# वडिलांचा हात धरून स्टेजवर आली आयरा

बुधवारी संध्याकाळी आमिर खानची मुलगी आयरा आणि फिटनेस एक्सपर्ट नुपूर शिखरे यांचा उदयपूरच्या हॉटेल ताज अरावली पॅलेसमध्ये विवाह झाला. हॉटेलच्या मयूरबागेत दुपारी 4 वाजता सुरू झालेल्या लग्नसोहळ्यासाठी आमिर खान आणि त्याची आई झीनत हुसैन वधू आयराला मंचावर घेऊन आले. यानंतर आयरा आणि नुपूर शिखरे यांनी एकमेकांचा हात धरला आणि एकत्र राहण्याचे वचन दिले. दोघांनीही एकमेकांबद्दलच्या भावना व्यक्त केल्या. यावेळी पांढऱ्या रंगाच्या थीमने मंडप सजवण्यात आला होता. लग्नानंतर, एक कौटुंबिक फोटोशूट झाले ज्यामध्ये आमिर खानच्या दोन्ही माजी पत्नी रीना दत्ता, किरण राव, पुतण्या इम्रान खानसह त्याचे संपूर्ण कुटुंब उपस्थित होते. फोटोशूटनंतर रात्रीचे जेवण झाले ज्यात पाहुण्यांना महाराष्ट्रीयन, राजस्थानी आणि गुजराती जेवण देण्यात आले. कढी-तांदूळ, राजस्थानी डाळ-बाती-चुरमा आणि डाळ-ढोकळा यांचाही मेनूमध्ये विशेष समावेश होता. तत्पूर्वी, मंगळवारी रात्री एका संगीत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये आमिरने हृतिक रोशनच्या 'कोई मिल गया' या चित्रपटातील 'इट्स मॅजिक...' या गाण्यावर खास परफॉर्मन्स दिला होता. आमिरने दुसरी माजी पत्नी किरण राव आणि मुलगा आझादसोबत स्टेजवर 'एक हजारों में मेरी बहना है..' हे गाणे गायले. या कार्यक्रमात परफॉर्म करण्यासाठी आमिर गेल्या काही दिवसांपासून शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेत होता. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या संगीत सेरेमनीमध्ये आयरा आणि नुपूरच्या कुटुंबातील सदस्यांनी आपापल्या परफॉर्मन्स दिला. पाहुण्यांनी पंजाबी आणि बॉलीवूड गाण्यांवर जोरदार नृत्य केले. फंक्शनमध्ये आयरा एम्ब्रॉयडरी लेहेंग्यात तर नुपूर पँट-सूटमध्ये दिसला. या जोडप्याचे मित्र आणि कुटुंबातील सदस्यांनी सोशल मीडियावर अनेक व्हिडिओ शेअर केले आहेत.



# ऐश्वर्याच्या घटस्फोटाच्या अफवांना पूर्णविराम

ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन गेल्या अनेक दिवसांपासून घटस्फोटाच्या अफवांमुळे चर्चेत आहेत. दरम्यान, ऐश्वर्या राय आता अभिषेक बच्चनच्या कबड्डी संघाला चिअर करताना दिसली. ऐश्वर्याचा व्हिडिओ समोर येताच तिच्या घटस्फोटाच्या अफवांना पूर्णविराम लागला आहे. अलीकडेच, स्टार स्पोर्ट्स इंडियाने प्रो कबड्डी लीगचा एक व्हिडिओ जारी केला आहे, ज्यामध्ये ऐश्वर्या राय, अभिषेक बच्चन, आराध्या बच्चन आणि अमिताभ कबड्डी संघ जयपूर पिंक पँथरला सपोर्ट करताना दिसत आहेत. संपूर्ण बच्चन कुटुंब टीमला सपोर्ट करताना खूप आनंदी दिसत असल्याचं व्हिडिओमध्ये पाहायला मिळत आहे. संघ जिंकल्यावर संपूर्ण कुटुंब आनंदाने जल्लोषात होते. अभिषेक बच्चन कबड्डी संघ जयपूर पिंक पँथरचा मालक आहे. प्रो कबड्डी लीगच्या 10 व्या हंगामात जयपूर पिंक पँथरचा सामना 7 जानेवारी रोजी यू मुंबाशी झाला. जयपूर संघाने मुंबई संघाचा 41-31 असा पराभव करत विजय मिळवला. संपूर्ण बच्चन कुटुंब प्रो कबड्डी लीगचा सामना पाहण्यासाठी त्याच जर्सी घालून आले होते. समोर आराध्या बसली होती, तर ऐश्वर्या अमिताभ बच्चनसोबत बसली होती. अभिषेक बच्चननेही त्याच्या टीम जयपूर पिंक पँथरची मॅच कुटुंबासोबत बसून पाहिली.

## सुपर ४ चं गणित बिघडलं

## श्रीलंकेने ६ गडी राखून विजयाची नोंद केली

# श्रीलंकेचा बांगलादेशवर विजय!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ स्पर्धेतील ५ वा सामना बांगलादेश आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या बांगलादेशला २० षटकांअखेर ५ गडी बाद १३९ धावा करता आल्या. या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेने ६ गडी राखून विजयाची नोंद केली आहे.**

### पथुम निसंकाने५० धावांची खेळी केली



आशिया चषकातील सुरुवातीच्या ४ सामन्यांमध्ये एकतर्फी लढत पाहायला मिळाली आहे. या सामन्यातही असच काहीसं चित्र पाहायला मिळालं. श्रीलंकेने या सामन्यात एकतर्फी विजयाची नोंद केली. श्रीलंकेला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १४० धावा करायच्या होत्या. श्रीलंकेचा फलंदाजीक्रम पाहता हे आव्हान फार मोठं नव्हतं. या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेकडून सलामीला आलेल्या पथुम निसंकाने ३४ चेंडूत ६ चौकार आणि १ षटकाराचा साहाय्याने ५० धावांची खेळी केली. पण कुसल मेंडीसला हवी तशी सुरुवात करून देता आली नाही. तो अवघ्या ३ धावांवर माघारी परतला. तर कुसल परेराने ९ धावांची खेळी केली. दासून शनाका १ धाव करून माघारी परतला. पण कामिल मिशारा शेवटपर्यंत टिकून राहिला. त्याने नाबाद ४६ धावांची खेळी करून श्रीलंकेच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. या विजयासह श्रीलंकेने २ गुणांची कमाई केली आहे. बांगलादेशचा हा २ सामन्यातील पहिला पराभव आहे. जर बांगलादेशने आणखी १ सामना गमावला तर, त्यांच्या सुपर ४ मध्ये प्रवेश करण्याच्या अडचणी वाढू शकतात.या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या बांगलादेशला हवी तशी सुरुवात करता आली नाही. सलामीला आलेले तांझिद हसन आणि परवेज हुसेन शून्यावर माघारी परतले. गेल्या सामन्यातील अर्धशतकवीर कर्णधार लिटन दासने या डावातही हातभार लावत २८ धावांची खेळी केली. शेवटी जाकेर अलीने नाबाद ४१ आणि शमीम हुसेनने नाबाद ४२ धावा करत संघाची धावसंख्या ५ गडी बाद १३९ धावांवर पोहोचवली. आशिया चषकातील सुरुवातीच्या ४ सामन्यांमध्ये एकतर्फी लढत पाहायला मिळाली आहे.

या सामन्यातही असच काहीसं चित्र पाहायला मिळालं. श्रीलंकेने या सामन्यात एकतर्फी विजयाची नोंद केली. श्रीलंकेला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १४० धावा करायच्या होत्या. श्रीलंकेचा फलंदाजीक्रम पाहता हे आव्हान फार मोठं नव्हतं. या धावांचा पाठलाग करताना

### १४० धावा करायच्या होत्या

आशिया चषकातील सुरुवातीच्या ४ सामन्यांमध्ये एकतर्फी लढत पाहायला मिळाली आहे. या सामन्यातही असच काहीसं चित्र पाहायला मिळालं. श्रीलंकेने या सामन्यात एकतर्फी विजयाची नोंद केली. श्रीलंकेला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १४० धावा करायच्या होत्या. श्रीलंकेचा फलंदाजीक्रम पाहता हे आव्हान फार मोठं नव्हतं.

श्रीलंकेकडून सलामीला आलेल्या पथुम निसंकाने ३४ चेंडूत ६ चौकार आणि १ षटकाराचा साहाय्याने ५० धावांची खेळी केली. पण कुसल मेंडीसला हवी तशी सुरुवात करून देता आली नाही. तो अवघ्या ३ धावांवर माघारी परतला.

तर कुसल परेराने ९ धावांची खेळी केली. दासून शनाका १ धाव करून माघारी परतला. पण कामिल मिशारा शेवटपर्यंत टिकून राहिला. त्याने नाबाद ४६ धावांची खेळी करून श्रीलंकेच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. या विजयासह श्रीलंकेने २ गुणांची कमाई केली आहे. बांगलादेशचा हा २ सामन्यातील पहिला पराभव आहे. जर बांगलादेशने आणखी १ सामना गमावला तर, त्यांच्या सुपर ४ मध्ये प्रवेश करण्याच्या अडचणी वाढू शकतात.या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या बांगलादेशला हवी तशी सुरुवात करता आली नाही. सलामीला आलेले तांझिद हसन आणि परवेज हुसेन शून्यावर माघारी परतले.

गेल्या सामन्यातील अर्धशतकवीर कर्णधार लिटन दासने या डावातही हातभार लावत २८ धावांची खेळी केली. शेवटी जाकेर अलीने नाबाद ४१ आणि शमीम हुसेनने नाबाद ४२ धावा करत संघाची धावसंख्या ५ गडी बाद १३९ धावांवर पोहोचवली. आशिया चषक २०२५ स्पर्धेतील ५ वा सामना बांगलादेश आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये पार पडला. २० षटकांअखेर ५ गडी बाद १३९ धावा करता आल्या. या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेने ६ गडी राखून विजयाची नोंद केली आहे.

## लोकांसाठी असेल हा सामना महत्वाचा

# PAK सामन्याआधी पाकिस्तानचा फलंदाज ‘हे’ काय म्हणाला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये आशिया चषक २०२५ स्पर्धेतील सर्वात महत्वाचा सामना रंगणार आहे. याआधी हा सामना होणार की नाही?असा प्रश्न उपस्थित केला जात होता. पण भारत सरकारने या सामन्यासाठी मंजुरी दिल्याने हा सामना होणार हे निश्चित झालं आहे.**



रविवारी होणाऱ्या या सामन्याच्या पुर्वसंध्येला पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेसाठी पाकिस्तानचा कर्णधार सलमान आगाने स्वत: येण्याऐवजी सलमीवीर फलंदाज सईम अयुबला पाठवलं. दरम्यान पत्रकारांच्या प्रश्नांची उत्तर देताना सईम अयुबने या सामन्याबद्दल मोठं वक्तव्य केलं आहे.भारत-पाकिस्तान हे दोन्ही संघ जेव्हा जेव्हा आमनेसामने येतात, तेव्हा हाय व्हॉल्टेज सामना पाहायला मिळत असतो. पण आम्ही कुठलाही दबाव घेणार नसल्याचं पाकिस्तानचा सलामीवीर सईम अयुबने म्हटलं आहे. लोकांसाठी हा मोठा सामना असेल, पण आम्ही केवळ एक संघ म्हणून

### दोन्ही संघ सुपर ४ मध्ये भिडणार

तसेच तो पुढे म्हणाला की, “ही स्पर्धा आमच्यासाठी महत्वाची आहे. आम्ही केवळ भारत- पाकिस्तान सामन्याची वाट पाहत नाही आहोत. आम्हाला ही स्पर्धा जिंकायची आहे.” भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ या स्पर्धेत ३ वेळेस आमनेसामने येऊ शकतात. साखळी फेरीतील सामने झाल्यानंतर दोन्ही संघ सुपर ४ मध्ये भिडणार आहेत.

या सामन्याकडे पाहत आहोत. पत्रकारांच्या प्रश्नांची उत्तरं देताना सईम अयुबने म्हटले की, “लोकांसाठी हा मोठा सामना असेल, पण आम्ही तेच करणार आहोत जे आम्ही प्रत्येक सामन्यात करतो.” अयुबच्या मते, हा सामना त्यांच्यासाठी फार महत्वाचा सामना नाही. या सामन्यातही ते त्याच रणनीतीसह मैदानात उतरणार आहेत, ज्या रणनीतीचा वापर ते इतर संघांविरूद्ध करतात. भारतीय संघाबद्दल विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देताना तो टाळाटाळ करताना दिसला. यावरून हे स्पष्ट आहे की, भारतीय संघाची दमदार कामगिरी पाहून पाकिस्तानचा संघ घाबरला आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
। दि. 14 सप्टेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## नागरिकांच्या मूलभूत समस्या समजून घेण्यासाठी प्रत्यक्ष भेट

# रिव्हर रेसिडेन्सीतील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आता ठोस कृती!

### युवा नेते आतिश बारणे यांची समस्या सोडवण्याची ग्वाही

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मोशी परिसरातील रिव्हर रेसिडेन्सी सोसायटीत नागरिकांच्या मूलभूत समस्या समजून घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पिंपरी-चिंचवड शहर उपाध्यक्ष आणि युवा नेते आतिश आनंदराव बारणे यांनी प्रत्यक्ष भेट दिली. या भेटीत नागरिकांनी पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, रस्त्यांची दुरवस्था, सार्वजनिक सुविधा आणि सुरक्षितता यांसारख्या अनेक समस्या त्यांच्या समोर मांडल्या. या समस्या सोडवण्यासाठी आता केवळ आश्वासन नाही तर ठोस कृती केली जाईल अशी ग्वाही यावेळी बारणे यांनी दिली.**



रिव्हर रेसिडेन्सी मध्ये गाठीभेटी घेत बारणे यांनी नागरिकांचे म्हणणे गांभीर्याने ऐकून घेत स्पष्ट केले की, “या समस्या मी वैयक्तिकरित्या पाहणार असून तातडीने आणि प्राधान्याने उपाययोजना केल्या जातील.” त्यांनी प्रशासनाशी थेट संवाद साधून पाठपुरावा करण्याचाही विश्वास नागरिकांना दिला.

यावेळी नागरिकांनीही आपल्या अडचणी आणि समस्या मोकळेपणाने मांडल्या .फक्त आश्वासने न देता कृतीद्वारे बदल घडवून आणणे, हेच ध्येय आहे,” असे सांगत बारणे यांनी सर्वसामान्यांच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे अधोरेखित केले. या भेटीमुळे रिव्हर रेसिडेन्सीतील नागरिकांमध्ये नव्याने विश्वास निर्माण झाला असून, बारणे यांच्याकडून भविष्यात ठोस बदल घडेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

---

## जल्लोष २०२५ युवक महोत्सवासाठी नावनोंदणीचे आवाहन

### शिक्षण विश्व: पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजतर्फे आयोजन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत विद्यार्थी विकास मंडळ आणि डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय पिंपरी पुणे - १८ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘जल्लोष २०२५-२६’ या जिल्हास्तरीय आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.**

DYP DPU

ही स्पर्धा १५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात सुरु होणार आहे. पिंपरी चिंचवड शहर तसेच मावळ, खेड, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली आहे.

या युवक महोत्सवामध्ये एकूण २७ कलाप्रकारांचा समावेश असून स्पर्धा प्रमुख पाच गटांमध्ये आयोजित करण्यात आल्या आहेत. संगीत विभागात शास्त्रीय भारतीय गायन, टाळ वाद्य, स्वर वाद्य, सुगम संगीत (भारतीय व पाश्चात्य), समूहगान, लोकसंगीत वाद्यवृंद यांचा समावेश आहे. नृत्य प्रकारात लोक व आदिवासी नृत्य तसेच शास्त्रीय भारतीय नृत्य घेतले जाणार आहे. रंगमंचीय कला विभागात एकांकिका, प्रहसन, मूकनाट्य, नकला तर ललित कला गटात स्थळचित्र, चित्रकला, भित्तिचित्र, मातीकला, मेहंदी, रांगोळी या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. वाङ्मय प्रकारात प्रश्नमंजुषा, वक्तृत्व आणि वादविवाद यांचा समावेश आहे.

विशेष बाब म्हणजे, इच्छुक विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या दिवशीही “स्पॉट एन्ट्री” द्वारे सहभाग नोंदविता येणार आहे. त्यामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक (अतिरिक्त कार्यभार) श्री. अभिजित कुलकर्णी, डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीचे अध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, सचिव डॉ. सोमनाथ पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. नीता मोहिते आणि सांस्कृतिक समन्वयक डॉ. शैलेन्द्र कांबळे यांनी केले आहे.

## शिक्षण विश्व: . विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्यांचा विकास व्हावा

# विद्यार्थ्यांनी अनुभवली विक्री व्यवस्थापन कला!

### मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे 'सेल्स डे' उत्साहात साजरा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड | प्रतिनिधी: मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये 'सेल्स डे' मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्यांचा विकास व्हावा, उद्योजकतेची गोडी लागावी आणि सर्जनशीलता वाढीस लागावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका डॉ. प्रदीपा नायर यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. शाळेच्या प्रांगणात सकाळपासूनच उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पसरले होते. विद्यार्थ्यांनी साकारलेले विविध प्रकारचे स्टॉल्स पाहण्यास पालक, शिक्षक आणि इतर पाहुण्यांनी मोठी गर्दी केली होती. स्टॉल्समध्ये हस्तकला वस्तू, पुस्तक विक्री, घरगुती खाद्यपदार्थ, सजावटीच्या वस्तू, खेळणी आणि इतर अनेक आकर्षक वस्तूंचा समावेश होता.

विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेचा आणि मेहनतीचा वापर करून आपल्या स्टॉल्सची रचना केली होती. प्रत्येक स्टॉलवर वेगवेगळ्या प्रकारचे उत्पादन, विक्री कौशल्य आणि ग्राहकांशी संवाद साधण्याचे प्रभावी सादरीकरण पाहायला मिळाले. लहान वयातच विद्यार्थ्यांनी व्यावसायिक दृष्टिकोन कसा विकसित केला जाऊ शकतो याचे उत्तम उदाहरण या उपक्रमातून दिसून आले.

मुख्याध्यापिका नायर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या काळात केवळ पुस्तकांचे ज्ञान पुरेसे नसून व्यावहारिक ज्ञानही तेवढेच महत्त्वाचे आहे. उद्योजकतेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाजात सकारात्मक योगदान द्यावे, असा संदेश त्यांनी दिला.

दिवसभर विविध स्पर्धा, गेम्स आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विद्यार्थ्यांबरोबरच पालक आणि शिक्षकांचाही सहभाग लक्षणीय होता. संध्याकाळी पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. यामध्ये उत्तम स्टॉल, सर्वोत्तम सादरीकरण, नाविन्यपूर्ण कल्पना अशा विविध श्रेणींमध्ये विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले.

हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ एक आनंदाचा दिवस ठरला नाही, तर त्यांना उद्योजकतेच्या दिशेने पहिले पाऊल टाकण्याची प्रेरणाही मिळाली. 'सेल्स डे' विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात आणि कौशल्यात मोलाची भर घालणारा ठरला.

# भाजपाकडून काँग्रेसचा तीव्र निषेध!

### शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**काँग्रेस पक्षाने बिहार निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्रींचा अपमान केल्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाने आज पिंपरी- चिंचवडमध्ये जोरदार आंदोलन केले. "स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी" या भारतीय संस्कृतीचा आणि मातृशक्तीचा अवमान करणाऱ्या काँग्रेसच्या विचारधारेचा निषेध करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.**




या आंदोलनात शहरातील भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विशेषतः महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. पिंपरी येथील भाजपा पक्ष कार्यालयाजवळ सकाळी १० वाजता हे आंदोलन झाले.

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. "काँग्रेसची विचारधारा नेहमीच विष पेरणारी असून, ती नारीशक्तीचा अवमान करणारी आहे," असा आरोप त्यांनी केला. पंतप्रधान हे देशाचे असतात आणि त्यांच्या आईबद्दल अपशब्द वापरणे, तसेच त्यांचे वाईट पद्धतीने चित्र रेखाटणे हा देशातील सर्व मातांचा अपमान आहे, अशी भूमिकाही काटे यांनी मांडली. "ही मातृशक्ती कधीही सहन करणार नाही," असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

या आंदोलनातून काँग्रेसच्या या कृत्याचा तीव्र निषेध करण्यात आला. आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजी करत काँग्रेसविरोधात संताप व्यक्त केला. कोणत्याही व्यक्तीने मातृशक्तीचा अनादर केल्यास तो सहन केला जाणार नाही, असा ठाम संदेश या आंदोलनातून देण्यात आला. तसेच,जनतेलाही मातृशक्तीच्या सन्मानासाठी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले. या आंदोलनात शहरातील विविध मंडळांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शहरात ठिकठिकाणी मंडलनिहाय आंदोलने पार पडल्याने काँग्रेसविरोधात तीव्र रोष दिसून आला.

DYP

**Dr. D. Y. PATIL COLLEGE OF AGRICULTURE BUSINESS MANAGEMENT, AKURDI, PUNE**

**Institute Code: 18197**

# TRAINING & PLACEMENT CELL

ORGANIZED



**STUDENTS INTERACTION SESSION UNDER**

Industry and Academic Integration for Industry's Demands & High Employability

**IN COLLABORATION WITH**

## KHET PE - SWAN ENERGY LTD.



**Date: 3rd Sep 2025**
**Time: 11.00am to 12.30pm**
**Venue: MCA Seminar Hall**

www.dypagribusiness.ac.in | info.dypagribusiness.ac.in | @dypabmakaurdi | @dypcabm | @dypabm


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046